# नवोपक्रम स्पर्धा

**सन : 2023-24**

## नवोपक्रमाचे शीर्षक

## देऊया प्रेरणा आणि उपक्रमांची साथ,

## 100% विद्यार्थ्यांमध्ये करूया FLN चा विकास

नवोपक्रम सादरकर्ता

**संतोष नवनाथ दौंड**

**(M.A., D.S.M., M.Ed., M.Phil, M.C.J., SET, NET)**

**पद : गटशिक्षणाधिकारी**

**भ्रमणध्वनीक्रमांक : 9209114999**

**ई-मेल : santoshdaund1981@gmail.com**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| 1 | नवोपक्रमाचे शीर्षक | 3 |
| 2 | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | 3 |
| 3 | नवोपक्रमाची उददिष्टे | 5 |
| 4 | नवोपक्रमाचे नियोजन | 5 |
| 5 | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 7 |
| 6 | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती | 13 |
| 7 | समारोप | 14 |
| 8 | संदर्भग्रंथसूची व परिशिष्टे | 15 ते 20 |

**शीर्षक**

## देऊया प्रेरणा आणि उपक्रमांची साथ,
## 100% विद्यार्थ्यांमध्ये करूया FLN चा विकास

### नवोपक्रमाची गरज व महत्त्व :

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समान आणि न्याय्य समज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, शास्त्रीय प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रामध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे.

असा स्पष्ट उल्लेख राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या प्रस्तावनामध्ये केलेला आहे. त्या अनुषंगाने या धोरणाच्या तत्त्वांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या गोष्टींना इयत्ता तिसरीपर्यंत सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक 27/10/2021 मध्ये खालील प्रमाणे निकष दिलेले आहेत. या अभियाना अंतर्गत राज्यातील ३ ते ९ वर्षे वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांसाठी सन २०२६-२७ पर्यंत खालील किमान शैक्षणिक लक्ष्य निर्धारित करण्यात येत आहेत.

| | अंगणवाडी/ बालवाडी अखेर | इयत्ता पहिली अखेर | इयत्ता दुसरी अखेर | इयत्ता तिसरी अखेर |
|---|---|---|---|---|
| भाषा साक्षरता | अक्षरे व त्यासंबंधी आवाज ओळखतो किमान 2-3 अक्षरे असलेले साधे शब्द वाचतो. | अपठित मजकूर असलेली किमान 4-5 साधे शब्द असलेली छोटी वाक्य वाचतो. | अपठित मजकूर 40 ते 50 शब्द प्रतिमिनिट अर्थासकट वाचतो. | अपठित मजकूर 60 शब्द प्रति मिनिट अर्थासकट वाचतो. |
| संख्या साक्षरता | १० पर्यंत अंक ज्ञान (ओळखणे व वाचणे) | 99 पर्यंत संख्यांचे वाचन, लेखन. साधी बेरीज व वजाबाकी करतो. | 999 पर्यंत संख्यांचे वाचन, लेखन. 99 पर्यंत संख्यांची वजाबाकी करतो. | 999 पर्यंत संख्यांचे वाचन, लेखन. सोपी गुणाकाराची उदाहरणे सोडवतो. |
| आनंदी व्यक्तिमत्वाची जोपासना (Well Being Goals) | मुलांना शैक्षणिक वातावरणात आनंदी व सुरक्षित वाटते. चांगल्या सवयी विकसित होतात. शरीर तंदुरुस्त राहते, स्वत: बाबतचा आदर वाढतो. स्वत:बाबत सकारात्मक कल्पना निर्माण होतात व सकारात्मक दृष्टीकोनाचे योग्य संवर्धन केल्यास आयुष्यभर लाभकारक ठरते. सर्व शिक्षकांनी मुलांच्या सामाजिक व भावनात्मक स्वास्थ्याची जपणूक कशी करावी याविषयी संवेदनशील असणे आवश्यक आहे. | | | |

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील मुद्दा क्रमांक 2.1 मध्ये वाचण्याची आणि लिहिण्याची आणि संख्यांच्या मूलभूत क्रिया करण्याची क्षमता हा एक आवश्यक पाया आणि भविष्यातील सर्व शालेय शिक्षणासाठी आणि निरंतर अध्ययनासाठी एक अनिवार्य पूर्वअट आहे.* असे म्हटले आहे. परंतु नवोपक्रमापूर्वी शाळा भेटीदरम्यान असे आढळून आले की, इयत्ता तिसरी पर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता व संकेत ज्ञान प्राप्त झालेले नाही. आणि म्हणूनच नवोपक्रमासाठी हा विषय निवडला.

**नवोपक्रमाची उददिष्टे :**

**1. अंगणवाडी/बालवाडी ते इयत्ता तिसरी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान बाबतच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.**

**2. इयत्ता तिसरी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसनासाठी उपक्रम कार्यान्वित करणे.**

**3. अंगणवाडी सेविका व शिक्षकांना उद्दिष्ट/लक्ष्य ठरवून देऊन प्रेरित करणे.**

**4. इयत्ता तिसरी पर्यंतच्या वर्गातील शंभर टक्के विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चा विकास करणे.**

**नवोपक्रमाचे नियोजन :**

**पूर्वस्थिती - प्रस्तुत नवोपक्रम घेण्यापूर्वी खालील प्रमाणे स्थिती होती :**

**1. शिक्षकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान बाबत माहिती नव्हती/ माहिती सांगता येत नव्हती.**

**2. अंगणवाडी सेविकांना पायाभूत साक्षरता व संख्यांमध्ये नेमके काय करायचे आहे हे माहीत नसल्याने निराशा जनक भूमिका होती.**

**3. काय करायचे ? हेच निश्चित नसल्याने काम जाणीवपूर्वक व नेमकेपणाने होत नव्हते.**

**4. अंगणवाडी सेविका व शिक्षकांमध्ये प्रेरणेचा अभाव होता. त्यांच्यामध्ये प्रेरणा निर्माण करण्याची गरज स्पष्ट जाणवत होती.**

**याबाबत सर्व केंद्रप्रमुख, साधन व्यक्ती तसेच डायट मधील प्राचार्य, जेष्ठ अधिव्याख्याता व इतर आधिव्याख्याता यांच्याशी चर्चा केली. अशी परिस्थिती राहिल्यास भविष्यामध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्याचे ध्येय लवकर साध्य होणार नाही हे सर्वांच्या चर्चेवरून जाणवले.**

त्यासाठी नवोपक्रमकर्त्याने नियोजनबद्ध उपक्रम राबविण्याचे ठरवले. त्या उपक्रमांची अंमलबजावणी केली. कार्यान्वित केलेले उपक्रम पुढे दिलेले आहेत.

सर्वप्रथम अंगणवाडी सेविका व शिक्षकांमध्ये ध्येय निश्चित केले गेले. ध्येयापर्यंत वाटचाल करण्यासाठी छोट्या छोट्या टप्प्यांमध्ये नियोजन करण्यात आले.

हा नवोपक्रम सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर 2023 या महिन्यांमध्ये कार्यान्वित करण्यात आला. तसेच पुढे 100% टक्के यशस्विता प्राप्त होईपर्यंत सुरू राहणार आहे. शेवटी कार्यान्वित केलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासण्यात आली.

या उपक्रमासाठी गट साधन केंद्रातील सर्व साधान व्यक्ती, सर्व केंद्रप्रमुख, सर्व मुख्याध्यापक, तालुक्यातील सर्व शिक्षक व तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविका तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका यांची मोलाची मदत झाली.

उपक्रमाचे काही फोटो, वृत्तपत्रांनी घेतलेली दखल व इतर पुरावे परिशिष्ट व इतर ठिकाणी जोडलेले आहेत.

उपक्रमोत्तर स्थिती -

1. माझे दीपावली पर्यंतचे लक्ष्य या उपक्रमामुळे अंगणवाडी सेविका तसेच इयत्ता पहिली ते तिसरीला अध्यापन करणाऱ्या 100% शिक्षकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मध्ये नेमके काय करायचे आहे हे माहीत झाले.

2. शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांनाही पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान च्या ध्येयाविषयी माहिती झाली.

3. शिक्षण परिषदांमधून सामूहिक मार्गदर्शन व ज्या अंगणवाडी सेविका/शिक्षिका किंवा शिक्षकांनी आपल्या वर्गातील शंभर टक्के विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान रुजविले आहे अशा शिक्षकांचा सन्मान केल्यामुळे शिक्षक प्रेरित झाले.

**4. अंगणवाडी/बालवाडीला अध्यापन करणाऱ्या सेविकांना आपण शिक्षक असल्याची जाणीव निर्माण झाली.**

**5. अंगणवाडी किंवा बालवाडी सेविका व येतात पहिली ते तिसरीला अध्यापन करणारे शिक्षक झपाटून कामाला लागले व पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञान शंभर टक्के विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्याचा वेग वाढला.**

## नवोपक्रमाची कार्यपद्धती :

**नवोपक्रम राबवण्यापूर्वीच्या स्थितीची निरीक्षणे नवोपक्रमाचे नियोजन मध्ये नोंदवण्यात आलेली आहे.**

**नवोपक्रमाच्या कार्यवाही दरम्यान अनेक अडचणी आल्या. त्यामधील एक अडचण म्हणजे अंगणवाडी सेविकांना शिक्षण परिषदांना येण्यासाठी काही पर्यवेक्षकांनी अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु माननीय उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालविकास तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी यांना अगोदरच पत्राद्वारे याबाबत कळविण्यात आले होते. त्यामुळे समस्या आपोआप सोडविली गेली.**

**नवोपक्रमाची कार्यवाही करताना अंगणवाडी सेविकांचा उत्साह अवर्णनीय होता. त्यांनी शिक्षण परिषदांमध्ये अतिशय उत्स्फूर्त सहभाग घेतला. काही अंगणवाडी सेविकांचे अनुभव शिक्षण शास्त्राच्या तत्त्वज्ञानाच्या बरोबरीचे होते.**

**नवोपक्रमाची कार्यवाही करताना बैठक व्यवस्थेची ही मोठी अडचण निर्माण झाली होती. परंतु केंद्रातील माध्यमिक शाळांच्या सभागृहांचा शिक्षण परिषदांसाठी उपयोग केल्यामुळे ही समस्या सोडवली गेली.**

**नवोपक्रमाची आजपर्यंतची यशस्विता खालील प्रमाणे आहे.**


तालुका - कर्जत

| अ.क्र. | केंद्राचे नाव | अंगणवाडी | | पहिली | | दुसरी | | तिसरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण वर्ग | 100 टक्के fln वर्ग | एकूण वर्ग | 100 टक्के fln वर्ग | एकूण वर्ग | 100 टक्के fln वर्ग | एकूण वर्ग | 100 टक्के fln वर्ग |
| 1 | कडाव | 14 | 9 | 12 | 6 | 12 | 10 | 12 | 12 |
| 2 | शेलू | 15 | 5 | 15 | 2 | 15 | 2 | 15 | 4 |
| 3 | पाथरज | 12 | 4 | 12 | 6 | 12 | 7 | 12 | 6 |
| 4 | खांडपे | 13 | 8 | 12 | 5 | 12 | 5 | 13 | 7 |
| 5 | नांदगाव | 14 | 4 | 14 | 4 | 11 | 6 | 14 | 9 |
| 6 | दहिवली नीड | 10 | 5 | 9 | 3 | 9 | 5 | 9 | 4 |
| 7 | खांडस | 12 | 2 | 10 | 5 | 9 | 3 | 9 | 7 |
| 8 | जामरूंग | 23 | 3 | 22 | 11 | 21 | 11 | 22 | 13 |
| 9 | कशेळे | 16 | 10 | 15 | 10 | 15 | 10 | 15 | 14 |
| 10 | नेरळ | 15 | 7 | 11 | 7 | 12 | 12 | 12 | 10 |
| 11 | वैजनाथ | 13 | 2 | 16 | 0 | 16 | 0 | 16 | 2 |
| 12 | भोईरवाडी | 10 | 3 | 10 | 2 | 10 | 2 | 10 | 2 |
| 13 | जांभिवली | 16 | 10 | 8 | 4 | 8 | 5 | 8 | 5 |
| 14 | चिंचवली | 11 | 10 | 8 | 7 | 8 | 8 | 8 | 7 |
| 15 | वारे | 14 | 14 | 14 | 6 | 14 | 10 | 14 | 8 |
| 16 | दहिवली माले | 10 | 2 | 10 | 0 | 10 | 1 | 10 | 1 |
| 17 | कळंब | 19 | 1 | 20 | 0 | 19 | 3 | 20 | 0 |
| 18 | बेकरे | 13 | 7 | 15 | 12 | 15 | 13 | 15 | 11 |
| 19 | वाकस | 13 | 3 | 12 | 3 | 13 | 2 | 13 | 2 |
| 20 | भिसेगाव | 20 | 10 | 15 | 6 | 15 | 7 | 15 | 4 |
| 21 | कर्जत | 9 | 6 | 9 | 5 | 8 | 3 | 9 | 3 |
| | एकूण | 292 | 125 | 269 | 104 | 264 | 125 | 271 | 131 |
| | टक्केवारी | | 42.808 | | 38.662 | | 47.348 | | 48.339 |
| | | सरासरी - 44.28947436 | | | | | | | |

**तक्त्यामधील प्रगती 45 टक्क्यांच्या आसपास दिसत आहे.**

**मात्र ही प्रगती फक्त शंभर टक्के पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त असलेल्या वर्गांच्या बाबतीतील आहे. इतरही सर्व वर्गातील साधारणपणे 80 टक्के पेक्षा अधिक विद्यार्थी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे ही टक्केवारी लवकरच 100% पर्यंत जाईल याची मला खात्री वाटते.**


**आलेख : केंद्रनिहाय प्रगती**



## कार्यान्वित केलेले उपक्रम

**1. माझे दिवाळीपर्यंतचे लक्ष्य :**




माझे दिवाळीपर्यंतचे लक्ष्य या उपक्रमामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याबाबत 2027 पर्यंत कोणते ध्येय निश्चित केले आहे. याबाबत ची पीडीएफ तयार करून सर्व शिक्षकांना whasaap ग्रुप वर पाठवली. शिक्षकांनी सदर पीडीएफ ची झेरॉक्स काढून आपल्या फलकाच्या शेजारी चिटकवण्यास सांगितले. कर्जत तालुक्यातील 273 शाळांमधील पहिली ते तिसरीच्या सर्व वर्ग शिक्षकांनी सदर पीडीएफ आपल्या फलकाच्या शेजारी चिटकवली. हीच कृती शाळेच्या बाजूला असलेल्या अंगणवाडी/बालवाडीतही केली गेली.

त्यामुळे शंभर टक्के अंगणवाडी सेविका व इयत्ता पहिली ते तिसरीला शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांना आपल्याला नक्की काय करायचे आहे ते लक्ष निश्चित केले गेले.

**पूर्वस्थिती :**

वरील लक्ष्यनिश्चितीपूर्वी शिक्षकांना व अंगणवाडी सेविकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यामध्ये नक्की काय अपेक्षित आहे. याबाबतची माहिती नव्हती हे शाळा भेटी व अंगणवाडी भेटीवरून लक्षात आले.

**उपक्रमोत्तर स्थिती :**

वरील माझे लक्ष्य या उपक्रमानंतर सर्व शिक्षकांना आपले उद्दिष्ट काय आहे याबाबत निश्चित माहिती झाली.

**2. प्रभावी शिक्षण परिषदांचे आयोजन**






कर्जत तालुक्यातील 21 केंद्रांमधील शिक्षण परिषदांचे आयोजन करताना शिक्षण परिषदांमध्ये अंगणवाडी सेविकांचा शंभर टक्के सहभाग घेण्यात आला. यामध्ये तालुक्यातील 302 अंगणवाडी सेविकांनी सहभाग घेतला.

सर्व अंगणवाडी सेविकांना व शंभर टक्के शिक्षकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याबाबतचे विशेष प्रशिक्षण शिक्षण परिषदेदरम्यान देण्यात आले. या सर्व शिक्षण परिषदांचे नियोजन अतिशय काटेकोरपणे केले गेले. प्रत्येक ठिकाणी गटशिक्षणाधिकारी यांनी स्वतः पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याबाबत मार्गदर्शन केले.

**उपक्रमपूर्व स्थिती :**

अंगणवाडी किंवा बालवाडी सेविकांना आपण शिक्षक आहोत ही भावना त्यांच्यामध्ये नव्हती. तसेच आकार शिक्षणक्रमाविषयी किंवा विद्यार्थ्यांना अध्यापन कशाप्रकारे करावे याविषयीचे ज्ञान त्यांना नव्हते. पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञान याबाबतही त्यांना कोणत्याही प्रकारची माहिति दिली गेली नव्हती.

**उपक्रमोत्तर स्थिती :**

शिक्षण परिषदांमध्ये अंगणवाडी किंवा बालवाडी सेविकांचा सहभाग घेतल्यानंतर आपण एक शिक्षक आहोत ही भावना त्यांच्यामध्ये तयार झाली. नव्हे तर ती जाणीवपूर्वक केली गेली. त्यामुळे

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यामध्ये नेमके काय करणे अपेक्षित आहे हे अंगणवाडी सेविकांना जाणीव झाली व त्यांनी वेगाने कामाला सुरुवात केली.

**3. शंभर टक्के विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान -पुरस्कारांची घोषणा :**

पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञानामध्ये सर्वात प्रथम 100% विद्यार्थी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त होणारी अंगणवाडी किंवा बालवाडी- अंगणवाडी सेविका, वर्ग -वर्गशिक्षक, शाळा- मुख्याध्यापक, केंद्र- केंद्रप्रमुख व बीट - बीट विस्ताराधिकारी (शिक्षण) यांना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. असे घोषित करण्यात आले. यामुळे शिक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रेरणा निर्माण झाली. अंगणवाडी सेविका व शिक्षकांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन काम वेगाने झाले.

**4. शाळा भेटी :**

शाळा भेटी दरम्यान पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या घटकांवर विशेष भर देण्यात आला. त्यासंबंधी वेगवेगळ्या उपक्रमांबाबत संपूर्ण गट साधन केंद्रातील साधन व्यक्तींनी शाळा शाळांमध्ये जाऊन मार्गदर्शन केले. याबाबत सर्व साधन व्यक्तींना गटशिक्षणाधिकारी यांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे कार्यवाही केली गेली.

शाळा भेटींचे वेळी शाळेशेजारी असलेल्या अंगणवाडीला जाणीवपूर्वक भेटी दिल्या गेल्या.

**5. शनिवारी तीस मिनिटे शिक्षक अंगणवाडीत :**







नवराष्ट्र

कर्जत तालुक्यातील अंगणवाड्यांमध्ये उपक्रम सुरू; जिल्हा परिषद शाळा शिक्षकांचे मार्गदर्शन

अंगणवाडीतील बालकांचा पाया मजबूत करणार

शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी मुलांना मदत

Raigad Plus Edition
04 December 2023 Page No. 4

पुण्यनगरी

अंगणवाडी बालक होताहेत प्रशिक्षित

शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी मदत होणार

बालकांना साक्षर करण्यासाठी शिक्षक सरसावले

या उपक्रमामध्ये शनिवारी इयत्ता पहिली किंवा दुसरीला शिकवणाऱ्या शिक्षकांनी अंगणवाडीमध्ये जाऊन मार्गदर्शन केले. तसेच विविध शैक्षणिक मोबाईल ॲप संबंधी अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन केले.

**उपक्रमपूर्व स्थिती :**

अंगणवाडी किंवा बालवाडी सेविकांना विद्यार्थ्यांना अध्यापन कशाप्रकारे करावे किंवा विद्यार्थ्यांचे अध्ययन कसे प्रभावी होईल याविषयी जास्त समज नव्हती.

**उपक्रमोत्तर स्थिती :**

अंगणवाडी किंवा बालवाडी सेविकांना विद्यार्थ्यांना अध्ययन प्रभावी होण्याचे विविध मार्ग माहीत झाले त्यामुळे अंगणवडी सेविका वेगाने शंभर टक्के विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्यांना निर्माण करू शकल्या.

## नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती :

1. अंगणवाडी/बालवाडी ते इयत्ता तिसरी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याबाबतच्या स्थितीचा केंद्रप्रमुखांमार्फत आढावा घेतला असता, एकाही वर्गातील शंभर टक्के विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त नव्हते.

2. अंगणवाडी/बालवाडी सेविका तसेच शिक्षकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यासाठी नेमके काय उद्दिष्ट आहे हे ज्ञात नव्हते.

**3. माझे दिवाळीपर्यंतचे लक्ष या उपक्रमानंतर सर्व अंगणवाडी सेविका तसेच शिक्षकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाचे ध्येय/उद्दिष्ट माहित झाले.**

**4. इयत्ता तिसरी पर्यांच्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसित करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम कार्यान्वित केले गेले.**

**5. अंगणवाडी/बालवाडी सेविकांना शनिवारी 30 मिनिटे अंगणवाडीसाठी या उपक्रमानंतर विद्यार्थ्यांना अध्यापन कसे करावे, या विषयी माहिती झाली. व विद्यार्थ्यांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्याची गती वाढली.**

**6. बक्षीस जाहीर केल्यामुळे शिक्षक व अंगणवाडी सेविकांमध्ये वेगाने काम करण्याची प्रेरणा निर्माण झाली.**

**7. पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञानाच्या बाबतीत कर्जत तालुक्याने तीन महिन्यांमध्ये 80% पर्यंत उद्दिष्ट साध्य केले.**

**समारोप :**

**देऊया प्रेरणा आणि उपक्रमांची साथ 100% विद्यार्थ्यांमध्ये करूया FLN चा विकास, या नवपक्रमामुळे शासनाने 2017 पर्यंत निर्धारित केलेले ध्येय 70% पर्यंत तीन महिन्यांमध्ये पूर्ण केले गेले. ही या उपक्रमाची सर्वात मोठी यशस्वीता आहे. यामुळे शिक्षक तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी खूप मोलाचा हातभार लागला. इयत्ता तिसरीपर्यंतच्याच नव्हे तर पुढील वर्गातील शिक्षकांनाही याचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला. गावातील विद्यार्थ्यांच्या पालकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान नक्की काय आहे याची माहिती झाली.**

**एकंदरीत हा उपक्रम अतिशय प्रभावी व यशस्वी ठरला याची मला खात्री वाटते.**

# संदर्भग्रंथ

**सोहनी, चित्रा (2008), "प्रायोगिक संशोधन पध्दती", नाशिक : य.च.म.मु.विदयापीठ**

**देशपांडे व., व सुमनकरंदीकर, (2013), मैत्री ज्ञानसंरचनावादाशी, पुणे :निराली प्रकाशन**

**नामदेवराव जरग (संपादक), (2014), दिशा नवोपक्रमांच्या, पुणे :महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 2020, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार**

Best, J. W. and James V. Kahn (2011), **'Research in Education'**, 10th Edition, PHI Learning private Limited, New Delhi – 110001

# परिशिष्टे

## परिशिष्ट : अ

## केंद्रनिहाय पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान आढावा तालुका - कर्जत

| अ.क्र. | केंद्राचे नाव | अंगणवाडी | | पहिली | | दुसरी | | तिसरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण वर्ग | 100 टक्के fln वर्ग | एकूण वर्ग | 100 टक्के fln वर्ग | एकूण वर्ग | 100 टक्के fln वर्ग | एकूण वर्ग | 100 टक्के fln वर्ग |
| 1 | कडाव | 14 | 9 | 12 | 6 | 12 | 10 | 12 | 12 |
| 2 | शेलू | 15 | 5 | 15 | 2 | 15 | 2 | 15 | 4 |
| 3 | पाथरज | 12 | 4 | 12 | 6 | 12 | 7 | 12 | 6 |
| 4 | खांडपे | 13 | 8 | 12 | 5 | 12 | 5 | 13 | 7 |
| 5 | नांदगाव | 14 | 4 | 14 | 4 | 11 | 6 | 14 | 9 |
| 6 | दहिवली नीड | 10 | 5 | 9 | 3 | 9 | 5 | 9 | 4 |
| 7 | खांडस | 12 | 2 | 10 | 5 | 9 | 3 | 9 | 7 |
| 8 | जामरूंग | 23 | 3 | 22 | 11 | 21 | 11 | 22 | 13 |
| 9 | कशेळे | 16 | 10 | 15 | 10 | 15 | 10 | 15 | 14 |
| 10 | नेरळ | 15 | 7 | 11 | 7 | 12 | 12 | 12 | 10 |
| 11 | वैजनाथ | 13 | 2 | 16 | 0 | 16 | 0 | 16 | 2 |
| 12 | भोईरवाडी | 10 | 3 | 10 | 2 | 10 | 2 | 10 | 2 |
| 13 | जांभिवली | 16 | 10 | 8 | 4 | 8 | 5 | 8 | 5 |
| 14 | चिंचवली | 11 | 10 | 8 | 7 | 8 | 8 | 8 | 7 |
| 15 | वारे | 14 | 14 | 14 | 6 | 14 | 10 | 14 | 8 |
| 16 | दहिवली माले | 10 | 2 | 10 | 0 | 10 | 1 | 10 | 1 |
| 17 | कळंब | 19 | 1 | 20 | 0 | 19 | 3 | 20 | 0 |
| 18 | बेकरे | 13 | 7 | 15 | 12 | 15 | 13 | 15 | 11 |
| 19 | वाकस | 13 | 3 | 12 | 3 | 13 | 2 | 13 | 2 |
| 20 | भिसेगाव | 20 | 10 | 15 | 6 | 15 | 7 | 15 | 4 |
| 21 | कर्जत | 9 | 6 | 9 | 5 | 8 | 3 | 9 | 3 |
| | एकूण | 292 | 125 | 269 | 104 | 264 | 125 | 271 | 131 |
| | टक्केवारी | | 42.808 | | 38.662 | | 47.348 | | 48.339 |
| | | सरासरी - 44.28947436 | | | | | | | |

## परिशिष्ट : ब
## वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

### बातमीची लिंक

https://youtu.be/bGOy2GxXmyk



साप्ताहिक कर्जत ...

RNI Title Code: M...

संपादक – प्रशांत नाना खराडे संपर्क: ९८९०८१५४०७

# कर्जत मधील अंगणवाड्य...
# गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड ...

**कर्जत- चांधई/नरेश कोळंबे**

शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी शासकीय स्तरावर अनेक प्रयत्न होताना दिसत आहेत परंतु काही निराशावादी घटकांमुळे सर्व उपक्रम यशस्वीपणे न राबवता त्याला बगल दिली जाते. परंतु कर्जत मधील गट शिक्षणाधिकारी संतोष दौंड यांच्या नवीन उपक्रमाने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.सर्व अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शाळेतील शिक्षकांना घेऊन त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक शासकीय कार्यक्रम हाती घेतले जात आहेत.मुलांचा कमी होणारा टक्का ...

तसेच अंगणवाडी सेविकांना या वैविध्यपूर्ण शिक्षणाचा मोठा फायदा होताना दिसून येत आहे. ह्या उपक्रमामुळे सर्व पालक वर्गाकडून गटशिक्षणाधिकारी व शिक्षक वर्ग ह्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतो आहे.

हा उपक्रम आम्ही सर्व शिक्षकांना सोबत घेऊन प्रत्येक शनिवारी अंगणवाडी आणि बालवाडी मध्ये राबविला.ह्या या प्रशिक्षण शिबिर आणि शिक्षणामुळे अनेक अंगणवाड्या शंभर टक्के विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान निकषानुसार क्षमता विकसित करू शकले आहेत तसेच त्याचा फायदा सर्व अंगणवाडी सेविकांना सुध्दा होत आहे.सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबददल त्यांचा आभारी आहे.



# बालकांना साक्षर करण्यासाठी शि...

। नेरळ । वार्ताहर ।

अंगणवाडी शाळेमध्ये येणाऱ्या बालकांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान निकषानुसार क्षमता वाढविण्याचा निर्णय राज्य शिक्षण मंडळाने घेतला आहे. ३०४ अंगणवाडीमध्ये रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी हा उपक्रम सुरु केला असून तालुका गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड यांनी हा उपक्रम सुरु केला आहे. अंगणवाड्यांमधील बालकांना साक्षर करण्याचा हा उपक्रम महाराष्ट्र राज्यातील पहिलाच उपक्रम असल्याचे ...

शाळेचे शिक्षक हे दर शनिवारी ३० मिनिटे अंगणवाडीसाठी ...


गट शिक्षणाधिकारी संतोष दौंड यांनी सर्व ...

# नवराष्

कर्जत तालुक्यातील अंगणवाड्यांमध्ये उपक्रम सुरू ; जिल्हा प

# अंगणवाडीतील बालकांचा पाय

**कर्जत,** (वा.) अंगणवाडी शाळेमध्ये येणाऱ्या बालकांना पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान निकषानुसार क्षमता वाढविण्यासाठी राज्य शिक्षण मंडळाने घेतला आहे. या उपक्रमाची सुरुवात कर्जत तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने हाती घेतला आहे. कर्जत तालुक्यातील ३०४ अंगणवाड्यांमध्ये जाऊन रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षकांनी हा उपक्रम सुरु केला असून तालुका गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड यांनी हा



## शिक्षणाचा स

1 कर्जतमधील गट शिक्षणाधिकारी संतोष दौंड यांच्या नवीन उपक्रमाने सर्वांच्य भुवया उंचावल्या आहेत. सर्व अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शाळेतील शिक्षकांना घेऊन त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे.

समिती शिक्षण विभाग यांनी हाती घेतला महिने दर शनिवा

जा.क्र./पंसक/गटशिक्षणाधिकारी/सशिअ/१०५/२०२३

पंचायत समिती कर्जत

दि. ०९/१०/२०२३

प्रति,

बालविकास प्रकल्प अधिकारी

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प

कर्जत १/२, ता.कर्जत, जि.रायगड

विषय - कर्जत तालुक्यातील अंगणवाडी सेविकांना शिक्षण परिषदेसाठी हजर राहण्यास आदेशीत करणेबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण व क्रीडाविभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२१/प्रक्र.१७९/एस.डी.६, दि.२७/१०/२०२१.

वरील सदर्भीय शासन निर्णयातील पृष्ट क्रमांक. ४ वरील मुद्दा क्रमांक ३ अन्वये अंगणवाडी सेविकांना FLN प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. चालू महातील शिक्षण परिषदांमध्ये हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे व वेळोवेळी याबाबत शिक्षण परिषदांमधून मार्गदर्शन व चर्चा केली जाते. याचा फायदा अंगणवाडी सेविकांना होण्यासाठी त्यांना माहे ऑक्टोबर २०२३ च्या शिक्षण परिषदांपासून पुढील सर्व शिक्षण परिषदांसाठी संबंधित केंद्रांच्या नियोजित टिकाणी अंगणवाडी सेविकांना उपस्थित राहण्यासाठी आपले स्तरावरून आदेशीत करावे. व तसे या कार्यालयास अवगत करावे. (अंगणवाडी सेविकांना शिक्षण परिषदे संदर्भात संबंधित गावातील जि.प.शाळेच्या मुख्याध्यापकाच्या संपर्कात राहावे.)

सोबत -

१. शासन निर्णय - शालेय शिक्षण व क्रीडाविभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२१/प्रक्र.१७९/एस.डी.६, दि.२७/१०/२०२१
२. शिक्षण परिषद नियोजन माहे ऑक्टोबर २०२३

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती कर्जत

माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प अलिबाग.
२. मा. प्रा. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल जि. रायगड
३. मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) रा.जि.प अलिबाग.
४. मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रा.जि.प अलिबाग.
५. मां. गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत, जि.रायगड

शिक्षण परिषद नियोजन माहे ऑक्टोबर २०२३
गट कर्जत

शिक्षण परिषदेची
वेळ : दुपारी 1.00 ते 5.00

१. जामरुंग केंद्र- दि.१३/१०/२०२३

२. कळंब केंद्र - दि १३/१०/२०२३

३. नेरळ केंद्र - दि. १६/१०/२०२३

४. शेलू केंद्र - दि. १६/१०/२०२३

५. कशेळे केंद्र - दि. १७/१०/२०२३

६. वैजनाथ केंद्र - दि. १७/१०/२०२३

७. भिसेगाव केंद्र - दि. १८/१०/२०२३

८. जांभिवली केंद्र + चिंचवली केंद्र - दि. १८/१०/२०२३

९. कर्जत केंद्र - दि. १८/१०/२०२३

१०. कडाव केंद्र - दि. १९/१०/२०२३

११. बेकरे केंद्र + भोईरवाडी केंद्र - दि. १९/१०/२०२३

१२. खांडस केंद्र + पाथरज केंद्र - दि. २०/१०/२०२३

१३. नांदगाव केंद्र + वारे केंद्र - दि.२०/१०/२०२३

१४. खांडपे केंद्र + दहिवली नीड केंद्र - दि.२५/१०/२०२३

१५. वाकस केंद्र + दहिवली माले केंद्र - दि.२५/१०/२०२३

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती कर्जत

शिक्षण परिषद नियोजन माहे - ऑक्टोबर 2023

गट : कर्जत वेळ : दुपारी 1.00 ते 5.00pm.

| अ.क्र. | केंद्र | ZP शिक्षक | माध्य. शिक्षक | अंगणवाडी | एकूण अपेक्षित उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | खांडपे | ३० | ४ | १४ | ४८ |
| २ | दहीवली नीड | २७ | १० | १० | ४७ |
| ३ | जांभिवली | २७ | २ | १६ | ४५ |
| ४ | वैजनाथ | ३७ | ८ | १६ | ६१ |
| ५ | कडाव | ३७ | ८ | १३ | ५८ |
| ६ | कशेळे | ३६ | १२ | १७ | ६५ |
| ७ | जामरूंग | ४६ | ४ | २४ | ७४ |
| ८ | पाथरज | २४ | २ | १२ | ३८ |
| ९ | खांडस | २० | ४ | १२ | ३६ |
| १० | नांदगाव | ३१ | २ | १४ | ४७ |
| ११ | कळंब | ४९ | ६ | २० | ७५ |
| १२ | वारे | ३१ | २ | ११ | ४४ |
| १३ | वाकस | ३७ | २ | १३ | ५२ |
| १४ | नेरळ | ५१ | ६ | १७ | ७४ |
| १५ | दही.माले | २३ | २ | १० | ३५ |
| १६ | शेलू | ५१ | १० | २१ | ८२ |
| १७ | बेकरे | ३६ | ४ | २० | ६० |
| १८ | चिंचवली | २० | ४ | १२ | ३६ |
| १९ | भिसेगाव | ४२ | ४ | २० | ६६ |
| २० | कर्जत | ३० | १२ | ६ | ४८ |
| २१ | भोईरवाडी | २१ | ० | १० | ३१ |
| | एकूण | ७०६ | १०८ | ३०८ | ११२२ |